# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

**संदर्भ** : साफुपुवि/निववि/४०१ दिनांक : २८/१२/२०२२

प्रति,
मा. विभागप्रमुख,
विद्यापीठ शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय** : गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी' या कार्यशाळा आयोजित करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत...

**संदर्भ** : या विभागाचे पत्र क्र. साफुपुवि/निववि/३९१, दिनांक १४/१२/२०२२

महोदय/ महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार गुणवत्ता सुधार योजना सन २०२२—२३ अंतर्गत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' ची अंमलबजावणी या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्याकरिता अर्थसहाय्यासाठी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडून ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी गुरुवार दि. १५/१२/२०२२ ते सोमवार दि. २६/१२/२०२२ असा निश्चित करण्यात आला होता.

या पत्रान्वये सदर प्रस्ताव सादर करण्यास मंगळवार दि. १० जानेवारी २०२३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून गुरुवार दि. १२ जानेवारी, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी. मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थांना बंधनकारक राहतील.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**unipune.ac.in—Home page—BOD online—Login—For College Users—College Login & Password—Planning and Development**

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करताना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास collegesupport@pun.unipune.ac.in या email-id वर अथवा ०२०—७१५३३६३३ या दूरध्वनी क्रमांकावर सपर्क साधावा. महाविद्यालये/परिसंस्थांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या प्रस्तावाची छापील प्रत आवश्यक कागदपत्रांसहीत विहीत मुदतीत नियोजन व विकास विभागामध्ये जमा न केल्यास तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,
28.12.22
डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)